# शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

## परिपत्रक

कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांची पुण्यतिथी निमित्त गुरुवार दि. 09/05/2024 रोजी सकाळी 10:30 वाजता विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारती समोरील कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांचे पुतळयास मा. कुलगुरू, डॉ. डी. टी. शिर्के यांचे शुभ हस्ते व मा .प्र. कुलगुरु, डॉ. पी. एस. पाटील व मा. कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करणेचा कार्यक्रम आयोजित केला आहे. तरी या कार्यक्रमास विद्यापीठातील सर्व प्राध्यापक प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनींनी उपस्थित रहावे ही विनंती.

संदर्भ क. शिवाजी वि /भूगोल विभाग/

दि. 8/05/2024

08/05/2024

विभागप्रमुख, भूगोल अधिविभाग
**Professor & Head**
**Department of Geography**
**Shivaji University, Kolhapur.**

प्रति,

1) सर्व पदव्युत्तर अधिविभाग प्रमूखांनी आपल्या अधिविभागातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी/विद्यार्थीनी यांना वरील कार्यक्रमास उपस्थित राहण्याबददल सूचना दयाव्यात.

2) सर्व प्रशासकीय विभागप्रमूखांनी आपल्या विभागातील सर्व शिक्षकेत्तर सेवकांना कार्यक्रमास उपस्थित राहण्याबददल सूचना द्याव्यात.

3) सर्व रेक्टर्स यांनी वसतिगृह व विद्यार्थी भवन मधिल नोटीस बोर्डवर हे परिपत्रक लावण्याची व्यवस्था करावी व विद्यार्थी/विद्यार्थीनीना उपस्थित राहण्याबददल सूचना दयाव्यात.

4) अभियांत्रिक विभागप्रमुखांनी खालील प्रमाणे कार्यवाहिची सूचना दयावी.

अ) कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांचे पुतळयाच्या परिसरात स्वच्छता ठेवण्याबाबत.

ब) कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांचे पुतळयास सकाळी ठिक 9.30 वाजता पुष्पहार घालण्याची व्यवस्था करावी.

5) उद्यान विभागप्रमूखांनी कार्यक्रमांच्या ठिकाणी योग्य त्या कुंडया ठेवून कार्यक्रमाची सुशोभितता वाढविण्याची योग्य ती कार्यवाही करावी.

6) भूगोल अधिविभाग यांनी पुष्पहार, फुले व पूजा साहित्य यांची व्यवस्था करावी.

7) श्री देवगोंडा चौगुले, जमादार व श्री विलास चांदणे जमादार यांनी कार्यक्रमाचे ठिकाणी आवश्यक टेबल, स्टूल स्टॅन्ड उपलब्ध करून द्यावे.